

**विधान भवन**
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ७२०६ /म.वि.स./ ई-२
दिनांक 23 APR 2026

**प्रेषक :**

**निवडणूक निर्णय अधिकारी,**
विधानपरिषद द्विवार्षिक निवडणूक, २०२६

**प्रति :**

**सर्व सन्मा. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य/**
**सर्व सन्मा.महाराष्ट्र विधानसभा सदस्य.**

**विषय :- विधानपरिषदेच्या सन २०२६ मध्ये होणाऱ्या द्विवार्षिक निवडणूकींकरीता प्रस्थापित करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाबाबत.**

**महोदय/महोदया,**

महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांद्वारे निवडून आलेल्या विधानपरिषदेच्या सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या नऊ जागा भरण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने विधानपरिषद द्विवार्षिक निवडणूक, २०२६ चा कार्यक्रम घोषित केला आहे.

सदर निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक २३ एप्रिल, २०२६ पासून ते निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कक्ष क्रमांक १२३, पहिला मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२ येथे **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे.

आपला,

**(जितेंद्र भोळे)**
**सचिव-१**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व
निवडणूक निर्णय अधिकारी

# महाराष्ट्र विधानपरिषद द्विवार्षिक निवडणूक, २०२६

महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांद्वारे घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगामार्फत घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम दिनांक २३ एप्रिल, २०२६ पासून सुरु होत असून नामनिर्देशन पत्र सादर करावयाची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत आहे व आवश्यक असल्यास दिनांक १२ मे, २०२६ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

या निवडणूकीमध्ये मतदाराचे मत मिळविण्याच्या दृष्टीने त्याला रोख रक्कम किंवा वस्तू देऊन अनुचित प्रभाव निर्माण करणे, मुक्तपणे मताधिकार वापरताना मतदारांना कोणत्याही प्रकारच्या धमक्या देणे, जबरदस्ती करणे, मतदानामध्ये फायद्यासाठी राज्य यंत्रणेचा गैरवापर करणे, संबंधित मतदान अधिकारी/पोलीस अधिकारी यांची पक्षपाती वृत्ती किंवा अयोग्य वागणूक यांचा मतदानाच्या योग्यतेवर होणारा प्रतिकूल परिणाम इत्यादीसंदर्भात जनतेच्या तक्रारींकरीता भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार, उपरोक्त निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक २३ एप्रिल, २०२६ पासून ते निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, **कक्ष क्रमांक १२३, पहिला मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२** येथे २४ X ७ तत्वावर **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे. ज्या कोणास या निवडणूकीसंदर्भात तक्रार सादर करावयाची असेल त्यांनी उपरोक्त नियंत्रण कक्षात करावी.

**(जितेंद्र भोळे)**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**व**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# Biennial Election to Mahrashtra Legislative Council, 2026

The Election Commission of India has declared a programme of Biennial Election to the Maharashtra Legislative Council by the members of the Maharashtra Legislative Assembly. Accordingly, the said programme of the Biennial Election is to commence from 23rd April, 2026 and the last date of making nominations is 30th April, 2026. Also, the poll, if required, will be taken on 12th May, 2026.

In pursuance of the directions issued by the Election Commission of India, a 24x7 Control Room has been put into operation at **Room No. 123, First Floor, Vidhan Bhavan, Mumbai – 400032 from 23rd April, 2026** till the completion of the electoral process in order to attend all complaints submitted by people with regard to but not restricted to undue influence by offering cash or kind to a voter with a view to getting his/her vote, any type of threat, coercion to voters in the free exercise of franchise, misuse of the state machinery for electoral gains, partisan attitude or unbecoming conduct of connected election officers/police officers adversely affecting the fairness of poll etc. Whoever wishes to submit a complaint in respect of the said election may submit the same in the aforementioned control room.

**(Jitendra Bhole)**
**Secretary-1,**
**Maharashtra Legislature Secretariat**
**and**
**Returning Officer**